# || ज्ञानसाधना गीत ||

सरस्वतीच्या मंदिरातली स्वीकारा अर्चना ज्ञानज्योतीने सदैव उजळो,
अपुली, ज्ञानसाधना ॥धृ॥

सत्यशिवाचे मंदिर सुंदर

मानव्याचा ध्यास निरंतर

गुरू शिष्याच्या नात्यामधली, व्रतस्थ मनसाधना ज्ञानज्योतीने सदैव
उजळो, अपुली, ज्ञानसाधना ॥ १ ॥

अज्ञानाचा तम हा सारून

विश्वात्मक स्वर येई उजळून

शूरवीर संतांचे पूजन, जागविते चेतना ज्ञानज्योतीने सदैव उजळो, अपुली,
ज्ञानसाधना ॥ २ ॥

कुणी न राहो येथे शोषित

ज्ञानापासून कुणि न वंचित

घडवायाचा माणूस सुंदर, ही अमुची प्रेरणा

ज्ञानज्योतीने सदैव उजळो, अपुली, ज्ञानसाधना ॥ ३॥

रसिक अतिथी तुम्ही मान्यवर

अमृतवाणी श्रवणा आतुर

स्वागत अपुले हृदयापासून, स्वीकारा वंदना ज्ञानज्योतीने सदैव उजळो,
अपुली, ज्ञानसाधना ॥४ ॥

कवी - प्रवीण दवणे